# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 19/02/2023 (रविवार) सकाळ

---

## चोरी

**१) पो.स्टे. मौदा** :- अंतर्गत १८ कि.मी. अंतरावरील पिपरी धानला शिवार येथे दिनांक १७/०२/२०२३ चे २१:०० वा. ते दिनांक १८/०२/२०२३ चे ०२.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे- बंडु शिवदास किरपान, वय ३५ वर्ष, रा. पिपरी ता. मौदा जि. नागपुर हे जेवण करून बकऱ्याला चारापाणी करून घरी झोपले असता बकऱ्यांचा ओरडण्याचा आवाज आल्याने फिर्यादीने झोपेतुन उठुन बकऱ्यांकडे जावुन पाहीले असता फिर्यादीचे २ मोठे काळया रंगाच्या व काळया पांढऱ्या रंगाचा पट्टा असलेले बकरे किंमती अंदाजे १२,०००/-रूपये दिसले नाही ते कोणीतरी अज्ञात चोराने चोरी करून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार मेश्राम ब. नं १६९ पोस्टे मौदा. मो. क्र. ९८२२५४५१६९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. काटोल** :- अंतर्गत मौजा पारडी रिठा शिवार येथे दिनांक १८/०२/२०२३ चे १५.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे- सुखदेव बानुदेव भैसस्वार, वय ८४ वर्ष, रा. मेंढकी ता. काटोल यांचे शेतातील दोन प्लास्टीकच्या चुमडीत असलेले ६० कीलो मोंसंबी फळ एकुण किंमती अंदाजे २४००/-रु. आरोपी नामे- १) मंगल गजानन मोरोलीया, वय २७ वर्ष व त्याचा साथीदार २) दिपक मानीकराव नोरोलीया दोन्ही रा. गोंन्ही ता. काटोल हे फिर्यादीच्या शेतातुन नमुद मुद्देमाल चोरून नेतांना मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक संतोष राठोड ब. नं. ७०३ पो.स्टे काटोल मो. नं. ८६६८२८४५६८ हे करीत आहे.

# विनयभंग

**पो.स्टे. सावनेर :–** दिनांक १८/०२/२०२३ चे २०.०० वा. दरम्यान फिर्यादी व तिची मुलगी व शेजारी राहणारी मुलगी हे महाशिवरात्री सणा निमीत्त छिंदवाडा रोडवरील शिवाजी चौक येथील शिवमंदीर मध्ये दर्शन करून परत येत असताना घटना वेळी व ठिकाणी घराकडे परत जात असताना अचानक एक सडपातळ काठीचा अंदाजे २४ ते २५ वयोगटाचा मुलगा हा फिर्यादीचे मागुन धावत फिर्यादीच्या दिशेने आला व त्याने दोन्ही हाताने फिर्यादी ला मागून पकडले व फिर्यादीचा विनयभंग केला त्यावर फिर्यादीने आरडा ओरड केल्याने व त्याला मागे ढकलले फिर्यादी व सोबत असलेली शेजारी मुलगी हिने त्याला पकडण्याचा प्रयत्न केला असता तो अनोळखी आरोपी छिंदवाडा रोडच्या दिशेन पळून गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४ **(D)** भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दोनोडे मो. नं ९१४६६२५५३२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**